

श्री.जयदिप डाकरे सर श्री.प्रविण डाकरे सर

# माझा अभ्यास

Study From Home

गुरुमाऊली
एक शैक्षणिक व्यासपीठ

Subscribe

इयत्ता – सहावी (22 जुलै) माझा अभ्यास

Subscribe

## शासनाच्या 45 दिवसाच्या ब्रीज कोर्ससोबत माझा अभ्यास PDF

शासनाच्या ब्रीज कोर्ससोबत क्षमता प्राप्त विद्यार्थ्यांसाठी चालू इयत्तेचा अभ्यासक्रम समाविष्ट

# दिवस बावीस :

CLICK HERE



टेस्ट सोडवा

गतवर्षीच्या क्षमता प्राप्त विद्यार्थ्यांसाठी चालू इयत्तेचा नियमित अभ्यासक्रम समाविष्ट.

## वाचा व सराव करा.

### सारे हसूया.



मुलगा – बाबा, बाबा टेलिफोनच्या तारा एवढ्या उंच का असतात?

बाबा – त्यावर कोणी कपडे वाळत घालू नये म्हणून.

### वाचा.

आमच्या आळीत कोणाच्याही घरी काही कार्यक्रम असो, की कोणी आजारी असो पारूमावशी तिथं हजर असणारच! उंच सडसडीत शरीरयष्टी, तरतरीत नाक, रंगाने काळीसावळी, सतत हसरा चेहरा, कपाळाला रुपयाएवढं कुंकू, नऊवारी साडी. डोक्यावरचा पदर सावरत ती कोणत्या न् कोणत्या कामात मग्न. रस्त्याने जाता-येता ती कोणाशी बोलली नाही, असं कधी घडत नाही. अख्ख्या आळीत तिच्यासाठी सगळ्यांचे दरवाजे कायम खुले असतात. तिच्या आवाजानं सगळं घर भरल्यासारखं होतं. घरातील एखादी व्यक्ती रुसलेली असली अन् पारूमावशीच्या लक्षात आलं, की तिचा रुसवा घालवून हसतंबोलतं केल्याशिवाय तिला चैन पडायचे नाही. गल्लीतल्या पोरांचा खेळताना पाय मुरगळला, कोणी धडपडलं, कोणाला खरचटलं तर आम्ही पोरं घरी न येता आधी तिच्याकडे जातो, मग घरी.

माझ्या आईचं अन् तिचं जरा जास्तच सख्य आहे. अडल्यानडल्याला ती आईजवळ येते. तिची सुख-दुःखं आईजवळ बोलते. पारूमावशीच्या घरची परिस्थिती बेताचीच. घरी खाणारी तोंड बरीच; पण कोणापुढं हात पसरणं पारूमावशीच्या स्वभावात बसत नाही. ज्याच्या घरी जाईल, त्या घरची होऊन जाणं, पडेल ते काम करणं एवढंच तिला माहीत. प्रत्येकाच्या सुख-दुःखात अगदी मनापासून सामील होणारी पारूमावशी सगळ्या आळीची 'मावशी' आहे आणि म्हणूनच सगळ्यांच्या मनात 'घर' करून आहे.

### सुविचार.

(१) सेवेचा एक हात प्रार्थनेसाठी जोडलेल्या दोन हातांपेक्षा अधिक उपयुक्त असतो.

(२) मनुष्याच्या मनाची ओढ व तळमळ निम्मे काम करते, उरलेले निम्मे काम अभ्यासाने होते.

(३) विजयी तोच होतो, जो विजयी होण्यासाठी साहस करतो.

(४) मनुष्याची सर्वांत मोठी संपत्ती म्हणजे त्याचे उत्तम चारित्र्य.

(५) ग्रंथ हे खरे पथदर्शक.

**शिक्षकांसाठी :** वरील उताऱ्यात पारूमावशीचे शब्दचित्र रेखाटले आहे. विद्यार्थ्यांना ते समजावून सांगावे. त्यांच्या ओळखीपैकी एका व्यक्तीचे शब्दचित्र रेखाटण्यासाठी मार्गदर्शन करावे.

वाचा व समजून घ्या.

## 3 पूर्णांक संख्या

टेस्ट सोडवा टेस्ट सोडवा

जाणून घेऊया.


### पूर्णांक संख्या

**धन संख्या, शून्य व ऋण संख्या मिळून संख्यांचा जो समूह तयार होतो, त्याला पूर्णांक संख्यासमूह म्हणतात.**

**गणित माझा सोबती : जत्रेमध्ये, लिफ्टमध्ये.**



वरील कुल्फीवाल्याचे चित्र पाहा. कुल्फीवाला बर्फ व मिठाच्या मिश्रणात कुल्फीचे साचे का ठेवत असेल ?





लिफ्टमधील बटणांना तळमजल्यासाठी 0 (शून्य), तर तळमजल्याच्या खालील मजल्यांना –1 व –2 असे क्रमांक दिलेले असतात.


जाणून घेऊया.

### संख्यारेषेवर पूर्णांक संख्या दाखवणे

संख्यारेषेवर ज्या बिंदूशी 0 ही संख्या दाखवली जाते, त्या बिंदूला आरंभबिंदू म्हणतात. 0 च्या उजवीकडे व डावीकडे समान अंतरांवर बिंदू दर्शवतात. उजवीकडील बिंदूंनी दाखवलेल्या संख्या धन व डावीकडील संख्या ऋण मानतात.




**उदा.** संख्यारेषेवर –7 व +8 या संख्या दाखवा.



Read and understand.

# 3 Integers

Let's learn.


## Integers

Positive numbers, zero and negative numbers together form a group of numbers called the group of integers.

My friend, Maths : At the fair, in the lift.



Look at the picture of the kulfi man. Why do you think he keeps the kulfi moulds in a mixture of salt and ice?





In a lift, the ground floor is numbered 0 (zero) while the floors below the ground level are numbered −1 and −2.


Let's learn.

## Showing Integers on the Number Line

The point on a number line which is marked 0 is called the origin. On the left and right of 0, points are marked at equal distances. The numbers shown by points on the right are positive numbers and those shown by points on the left are negative numbers.




**Example :** Show the numbers −7 and +8 on the number line.



## Read and understand.

**POINTERS**

**1. Answer the following questions.**

(a) Where does Raman live ?
(b) Where does Sanjumama live ?
(c) Name the river in Sagroli.
(d) Who has a library?
(e) If Raman made a list of his relatives at Sagroli, what names would he write ?

**2. List the interesting things that Raman did at Sagroli.**
**Number them according to your preferences.**
**Compare your preferences with those of your friends'.**

HNNW8J

**3. Spot the exclamations (!) in the letter and copy the sentences.**

**4.** (a) Find and copy the non-English words in the letter.
(b) Make a list of your favourite foods/dishes. How many of the words are English?
(c) List five of your favourite books or stories. How many of the names are English?

Note that non-English words should be pronounced without trying to give them an 'English' accent.

**5. Find the smaller words hidden in the following words.**
**Do not change the order of the letters in the words.**

- reached • wonderful • unforgettable • colourful • incomparable • lovingly

**6. Note that** '9 June 2015' **or** 'June 9, 2015' **is read as** 'The ninth of June two thousand and fifteen'.
**Similarly,** '1 January' **or** 'January 1' **is read as** 'The first of January'.
**Now read the following :**

- 15 August • 22 December • 26 January • 1 May • 21 June

**Do you remember?**

Ordinal numbers

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | one | $1^{st}$ | first | 9. | nine | $9^{th}$ | ninth |
| 2. | two | $2^{nd}$ | second | 10. | ten | $10^{th}$ | tenth |
| 3. | three | $3^{rd}$ | third | 11. | eleven | $11^{th}$ | eleventh |
| 4. | four | $4^{th}$ | fourth | 12. | twelve | $12^{th}$ | twelfth |
| 5. | five | $5^{th}$ | fifth | 13. | thirteen | $13^{th}$ | thirteenth |
| 6. | six | $6^{th}$ | sixth | 14. | fourteen | $14^{th}$ | fourteenth |
| 7. | seven | $7^{th}$ | seventh | 15. | fifteen | $15^{th}$ | fifteenth |
| 8. | eight | $8^{th}$ | eighth | 20. | twenty | $20^{th}$ | twentieth |

100. one hundred $100^{th}$ hundredth

## ३. हडप्पा संस्कृती

टेस्ट सोडवा

पाठ वाचा व समजून घ्या.

इत्यादी ठिकाणीही उत्खननात अशाच प्रकारचे अवशेष सापडले आहेत.

हडप्पा संस्कृतीची वैशिष्ट्ये सर्वसाधारणपणे सर्वत्र सारखीच आढळतात. नगररचना, रस्ते, घरबांधणी, सांडपाण्याची व्यवस्था, मुद्रा, भांडी, खेळणी, मृतदेह पुरण्याची पद्धत यांचा त्यांत प्रामुख्याने समावेश होतो.

**सांगा पाहू !**

- तुमच्या परिसरातील/गावातील घरांची रचना कशी आहे ?
- घरे कौलारू, धाब्याची, उतरत्या छपरांची या प्रकारची आहेत का ?

### ३.२ घरे आणि नगररचना

हडप्पा संस्कृतीच्या लोकांची घरे आणि इतर बांधकामे प्रामुख्याने भाजक्या विटांची होती. काही ठिकाणी कच्च्या विटा आणि दगडांचा वापरही बांधकामासाठी केला जाई. मधोमध चौक आणि त्याभोवती खोल्या अशा प्रकारची घरांची रचना असे. घरांच्या आवारात विहिरी, स्नानगृहे, शौचालये असत. सांडपाणी वाहून नेण्याची उत्तम व्यवस्था असे. त्यासाठी मातीच्या भाजक्या पन्हाळींचा उपयोग केला जाई. रस्त्यावरील गटारे विटांनी बांधून काढलेली असत. ती झाकलेली असत. यावरून सार्वजनिक आरोग्याबद्दल ते किती जागरूक होते ते दिसते.



हडप्पा संस्कृतीतील विहीर

**सांगा पाहू !**

- सांडपाणी वाहून नेणारी गटारे झाकलेली नसतील तर आरोग्याच्या कोणकोणत्या समस्या निर्माण होतात ?

रस्ते रुंद असून एकमेकांना काटकोनात छेदतील अशा पद्धतीने बांधलेले असत. त्यामुळे तयार होणाऱ्या चौकोनी मोकळ्या जागेत घरे बांधली जात. नगरांचे दोन किंवा अधिक विभाग केलेले असत आणि प्रत्येक विभागाला स्वतंत्र तटबंदी केलेली असे.

**करून पहा.**

एक बटाटा घ्या. तो मधोमध कापा. कापलेल्या भागावर काही अक्षरे, आकृती खिळ्याच्या साहाय्याने कोरा. अक्षरे, आकृती कोरलेला भाग शाईत किंवा रंगात बुडवा. रंगीत भाग कोऱ्या कागदावर उमटवा. काय होते त्याचे निरीक्षण करा.

### ३.३ मुद्रा–भांडी

हडप्पा संस्कृतीच्या मुद्रा प्राधान्याने चौरस आकाराच्या, स्टिएटाईट नावाच्या दगडापासून बनवल्या जात. मुद्रांवर विविध प्राण्यांच्या आकृती आहेत. त्यांमध्ये बैल, म्हैस, हत्ती, गेंडा, वाघ यांसारखे खरेखुरे प्राणी आणि एकशृंगासारखे कल्पित प्राणी पाहायला मिळतात. इतर प्राण्यांच्या आकृतींप्रमाणेच मनुष्याकृतीही आढळतात. या मुद्रा ठसा उमटवण्यासाठी वापरल्या जात.





मुद्रा

## निरीक्षण करा व समजून घ्या. सराव

टेस्ट सोडवा

### २. चला वृत्ते वापरूयात !

उदा., दिल्ली हे ठिकाण २८°३६'५०" उ. अक्षांश व ७७°१२'३" पू. रेखांशावर आहे.


- पृथ्वीवरील कोणत्याही प्रदेशाचा विस्तार सांगताना नेहमी त्याच्या सर्वदूर टोकांकडील अक्षवृत्ते व रेखावृत्ते विचारात घेतली जातात. उदा., ऑस्ट्रेलिया देशाचा विस्तार १०° ३०' द. ते ४३° ३९' द. अक्षवृत्ते व ११३° पू. ते १५३° ३०' पू. रेखावृत्ता दरम्यान आहे.
- पृथ्वीवरील नदी, रस्ता, सीमा इत्यादी रेषीय बाबींचा विस्तार सांगताना सुरुवातीच्या स्थानावरील अक्षांश व रेखांश तसेच शेवटच्या स्थानावरील अक्षांश व रेखांश विचारात घेतले जातात. उदा., आफ्रिका खंडातील नाईल नदी व्हिक्टोरिया सरोवरात उगम पावते आणि उत्तरेकडे वाहत जाऊन ॲलेक्झांड्रिया शहराजवळ भूमध्य समुद्रास मिळते. व्हिक्टोरिया सरोवराचे स्थान ०°४५' २१" द. अक्षांश व ३३°२६' १८" पू. रेखांश आहे. तसेच ॲलेक्झांड्रिया शहराचे वृत्तीय स्थान ३१°१२' उ. अक्षवृत्त व २९°५५' ०७" पू. रेखावृत्त आहे. नाईल नदीच्या वृत्तीय विस्तारासाठी हे अक्षांश व रेखांश विचारात घेऊन नाईलनदीचा वृत्तीय विस्तार ०°४५' द. अक्षांश व ३३° २६' पू. रेखांशापासून (उगमापासून) ३१° १२' उ. अक्षांश व २९° ५५' पू. रेखांशापर्यंत (मुखापर्यंत) आहे असे सांगता येईल.

✲ **चला, वृत्ते वापरूयात**

आकृती २.३ च्या आधारे स्थान व विस्तार यांसंबंधीच्या प्रश्नांची उत्तरे द्या.

- ब्राझीलची राजधानी ब्राझिलीयाचे स्थान कोणत्या अक्षांश व रेखांशाने निश्चित होते ?
- ५° १५' उ. अक्षवृत्त ते ३३° ४५' द. अक्षवृत्तां दरम्यान असणारा ब्राझील देश कोणकोणत्या रेखावृत्तां दरम्यान आहे ?
- ब्राझील या देशाचा उत्तर – दक्षिण विस्तार कोणकोणत्या गोलार्धात आहे ?
- ब्राझील या देशाचा पूर्व–पश्चिम विस्तार कोणत्या गोलार्धात आहे ?
- साओ फ्रान्सिस्को नदीचा विस्तार कोणत्या वृत्तांच्या आधारे लिहता येईल ?
- माराजॉ बेटाचे स्थान अक्षवृत्त व रेखावृत्ताच्या आधारे सांगा.

**नकाशाशी मैत्री.**




आकृती २.३ : ब्राझीलचा नकाशा

# २ सजीव सृष्टी

टेस्ट सोडवा

**सांगा पाहू !** चित्रांतून काय लक्षात येते?

## प्रजनन किंवा पुनरुत्पादन

सजीव स्वत:सारखा दुसरा जीव निर्माण करतात. काही सजीव पिलांना जन्म देतात, तर काही अंडी घालतात. त्यांतून पिलांचा जन्म होतो. वनस्पतींच्या बिया, खोडे, पाने यांपासून वनस्पतींची नवीन रोपे तयार होतात.

सजीवांच्या स्वत:सारखा दुसरा जीव निर्माण करण्याच्या क्रियेला प्रजनन किंवा पुनरुत्पादन म्हणतात. प्रजनन हे सजीवांचे लक्षण आहे.



पक्षी व अंडी



पानफुटी






गुलाबाचे कलम

२.११ : पुनरुत्पादन

**जरा डोके चालवा.**

पृथ्वीवर अनेक प्रकारचे प्राणी व वनस्पती आजही का टिकून आहेत?

**निरीक्षण करा व चर्चा करा.**



२.१२ : आयुर्मान

## ठराविक आयुर्मान

जीवनकालाच्या ठराविक टप्प्यावर सजीव प्रजननक्षम होतात. काही काळानंतर पुढे त्यांचे अवयव क्षीण होत जातात आणि कालांतराने त्यांचा जीवनकाल संपतो म्हणजेच **सजीव मृत्यू पावतात.** विविध प्राणी आणि वनस्पतींचे आयुर्मान म्हणजेच जीवनकाल वेगवेगळे आहेत. उदाहरणार्थ कुत्रा या प्राण्याचे आयुर्मान साधारणपणे १२ ते १८ वर्षे असते तर शहामृग हा पक्षी सुमारे ५० वर्षे जगतो.

सजीव नेमके कसे आहेत, ते कसे तयार झाले आहेत, कशापासून तयार झाले आहेत, असे प्रश्न तुम्हांला पडले असतील.

**Read and understand.**

**Can you tell ?** What do we learn from these pictures ?

## Reproduction

Living things produce other living things like themselves. Some animals give birth to their young ones. Some lay eggs. Their young ones hatch out of the eggs. New plants are produced from the seeds, stems or leaves of plants.

The process by which a living thing generates a new living thing like itself is called reproduction or procreation.

Reproduction is a characteristic of living things.



A bird and its eggs



Bryophyllum



A mare and her foal




Rose cuttings

2.11 : Reproduction

**Use your brain power !**

Why have so many types of plants and animals been able to survive on the earth even today ?

**Observe and discuss.**



2.12 : Lifespan

## A definite lifespan

At a certain stage of life, living things become capable of reproduction. Later on in life reproduction stage, their organs become weak and still later, their life comes to an end. In other words, living things die. The lifespans of different animals and plants are different. For example, the lifespan of the dog is about 12 to 18 years, while the ostrich lives for 50 years.

You may have wondered what exactly the living things are, how they came into being, and so on.

● सुनो और दोहराओ :

टेस्ट सोडवा

# ३. उपहार

रियाज



विचार मंथन



।। ईमानदारी चरित्र निर्माण की नींव है ।।

"ठीक है," ऐसा कहकर ऋत्विक वहाँ से चला गया । अभी वह कुछ दूर ही गया था कि उसे रास्ते में गिरी हुई एक पोटली मिली । ऋत्विक को यह विश्वास हो गया कि लाल रंग की इस मखमली पोटली में कोई कीमती चीज होगी । उसने उसे खोलना चाहा फिर सोचने लगा । जब यह मेरी नहीं है तो इसे खोलने का मुझे हक नहीं है । ऋत्विक ने पोटली नहीं खोली । तभी किसी की आवाज उसके कानों में पड़ी । "बेटा, मेरी पोटली गिर गई है, रास्ते में । क्या तुमने देखी है ?"

ऋत्विक ने पूछा, "किस रंग की थी ?" "लाल रंग की," राहगीर ने बताया । "और कोई पहचान बताओ ।" ऋत्विक ने राहगीर से कहा । "उसपर एक परी का सुनहरे रंग में चित्र बना है ।" राहगीर का जवाब था । ऋत्विक ने अपनी थैली से जब वह पोटली निकाली तो उसपर छपा परी का चित्र चमकने लगा । ऋत्विक ने वह पोटली राहगीर को दे दी ।

सुबह उठकर वह वहीं पहुँचा, जहाँ उसे परी मिली थी । देखा तो वहाँ कोई नहीं था । वह बैठ गया। उसकी आँखों के सामने वही लाल रंग की पोटली दिखाई देने लगी । तभी तेज प्रकाश फैला । सामने परी खड़ी थी । परी के दोनों हाथ पीछे थे । परी ने पूछा, " कैसे हो ?" "ठीक हूँ !" ऋत्विक ने जवाब दिया । तभी परी ने कहा, "अपनी आँखें बंद करो ! मैं तुम्हें इनाम दूँगी ।" "किस बात का ?" ऋत्विक ने पूछा ।

"तुम उत्तीर्ण हो गए इसलिए ।" परी बोली ।

परी की बात ऋत्विक की समझ में नहीं आ रही थी । उसने आँखें बंद कर लीं । परी ने उसके हाथों में एक मखमली थैली पकड़ा दी । ऋत्विक ने देखा तो हैरान रह गया । यह तो वही पोटली थी, जो उसने राहगीर को दी थी । परी ने कहा, "कल मैंने ही तुम्हारी ईमानदारी की परीक्षा ली थी । वह राहगीर भी मैं ही थी इसलिए मैं तुम्हें यह इनाम दे रही हूँ ।"

परी ने ऋत्विक को समझाया, "ईमानदार व्यक्ति के जीवन में किसी वस्तु की कमी नहीं होती। जाओ ! अब तुम्हें मनचाही वस्तु मिलेगी ।"

ऋत्विक के पास शब्द नहीं थे जिनसे वह परी को धन्यवाद देता । खुशी से उसकी आँखें भर आईं ।

लाल मखमली पोटली ऋत्विक ने अपनी माँ को दी । उसकी समझ में यह नहीं आया कि उसका बेटा उसे क्या दे रहा है । जब माँ वह पोटली खोलने लगी तब



## स्वयंमूल्यमापन चाचणी पहा खालील लिंकवर..

| पहिली | दुसरी | तिसरी | चौथी | पाचवी | सहावी | सातवी |
|---|---|---|---|---|---|---|
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

## माझा ऑनलाईन अभ्यास – प्रत्येक घटकाच्या टेस्ट सोडवा खालील लिंकवरून

| सहावी मराठी | सहावी गणित | सेमी गणित | सहावी इंग्रजी | सहावी इतिहास |
|---|---|---|---|---|
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

| सहावी भूगोल | सहावी विज्ञान | सेमी विज्ञान | सहावी हिंदी |
|---|---|---|---|
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

## दररोजच्या माझा अभ्यास pdf तुम्हाला खालील लिंकवर मिळतील.

| पहिली | दुसरी | तिसरी | चौथी | पाचवी | सहावी | सातवी |
|---|---|---|---|---|---|---|
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

## इतर इयत्तांच्या ऑनलाईन टेस्ट सोडवा खालील लिंकवरुन...

| पहिली | दुसरी | तिसरी | चौथी | पाचवी | सहावी | सातवी |
|---|---|---|---|---|---|---|
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

## MiniShala शैक्षणिक ॲप्स खालील लिंकवरुन डाऊनलोड करा.

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| पहिली | दुसरी | तिसरी | चौथी | पाचवी | सहावी | सातवी |
| | | आठवी | नववी | दहावी | | |

## गुरुमाऊली शैक्षणिक ॲप्स – Click Here